दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | मंगळवार दि.५ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २४४ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Tuesday 5 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 244 | Pages 4 | Rate 4 Rs

### विरोधक डरपोक, बहाणेबाज व रडणारे लोक

**मुंबई**–भाजप नेते तथा मंत्री आशिष शेलार यांनी ५ राज्यांतील विधानसभा निवडणुकीतील भाजपच्या उल्लेखनीय कामगिरीवरून विरोधकांवर निशाणा साधला आहे. विरोधक हे डरपोक, बहाणेबाज व रडके लोक आहेत. त्यांना स्वतःचा पराभव पचवता येत नाही. त्यामुळे मी त्यांचे नाव रडके असे ठेवतो. त्यांना थोडी जरी अक्कल असेल, तर त्यांनी आत्मचिंतन करावे, असे ते म्हणालेत.५ राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत भाजपचा पश्चिम बंगाल व आसाम या २ राज्यांत विजय होण्याची शक्यता आहे. मंत्री आशिष शेलार यांनी या प्रकरणी मतदारांसह या राज्यांतील भाजप कार्यकर्त्यांचे आभार मानले. ते म्हणाले, संपूर्ण देशात भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व व त्याचा जल्लोष दिसून येत आहे. मी सर्वच मतदारांचे आभार मानतो. या निवडणुकीत कष्ट घेणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांचेही मी आभार मानतो. विशेषतः केरळ व पश्चिम बंगाल येथील आमच्या कार्यकर्त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काम केले. त्यांनी सर्व आव्हानांवर मात करून आपल्या प्राणांची बाजी लावली.

# पश्चिम बंगालमध्ये भाजपची एकहाती सत्ता

## ममता बॅनर्जींचा विधानसभा निवडणुकीत पराभव

**पश्चिम बंगालमध्ये भाजपची एकहाती सत्ता स्थापन होणार आहे तर आसाम आणि पुदुच्चेरीत एनडीएची सत्ता स्थापन होणार आहे. पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव झाला. शुभेंदू अधिकारी भवानीपूर विधानसभा मतदारसंघातून विजयी झाले. भवानीपूर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपच्या सुवेंदू अधिकारी यांना ७३ हजार ९१७ मते मिळाली तर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या सर्वोच्च नेत्या ममता बॅनर्जी यांना ५८ हजार ८१२ मते मिळाली. सुवेंदू अधिकारी यांनी ममतांच्या विरोधातील निवडणूक १५ हजार १०५ मतांनी जिंकली. तब्बल २० फेऱ्यांच्या मतमोजणीनंतर अधिकारी यांनी निवडणूक जिंकली.**



दैनिक वादळ वार्ता

**कोलकाता (वृत्तसंस्था)**

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निकालांनुसार पश्चिम बंगालमध्ये २९४ पैकी २९२ जागांचे कल आणि निकाल जाहीर झाले आहेत. भाजपने १८२ जागा जिंकल्या असून २५ जागांवर आघाडी घेतली आहे. बहुमतासाठी आवश्यक १४७ चा आकडा पार केल्यामुळे पश्चिम बंगालमध्ये भाजपची एकहाती सत्ता स्थापन होणार आहे. आसामच्या १२६ पैकी १२४ जागांचे कल आणि निकाल जाहीर झाले आहेत. भाजपने ८१ जागा जिंकल्या असून एका जागेवर आघाडी घेतली आहे. काँग्रेसने १८ जागा जिंकल्या आणि एका जागेवर आघाडी घेतली आहे. बोडोलँड पीपल्स फ्रंट आणि आसाम गण परिषद यांनी प्रत्येकी १० तर ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट आणि रायजोर दलने प्रत्येकी २ जागा जिंकल्या आहेत. तृणमूल काँग्रेसने एका जागेवर विजय मिळवला आहे. आसाममध्ये एनडीएने बहुमताचा आकडा पार केला आहे. तसेच पुदुच्चेरीत ३० पैकी २९ जागांचे कल आणि निकाल जाहीर झाले आहेत. ऑल इंडिया एनआर काँग्रेसने ११ जागा जिंकल्या असून एका जागेवर आघाडी घेतली आहे. द्रमुकने पाच जागा जिंकल्या आहेत. भाजपने चार जागा जिंकल्या आहेत. टीव्हीकेने दोन तर काँग्रेस, लाचिया जननायक कच्ची, अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळघम, एनवायएमके यांनी प्रत्येकी एक जागा जिंकली. या व्यतिरिक्त तीन अपक्ष उमेदवार विजयी झाले आहेत. पुदुच्चेरीतही एनडीएने बहुमताचा आकडा पार केला आहे.

केरळमध्ये सर्व १४० जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. काँग्रेसने ६३, सीपीआयएमने २६, आययूएमएलने २२, सीपीआयने ८, केईसीने ७, आरएसपीने ३, भाजपने ३, आरजेडीने १, आरएमपीओआयने १, केरळ काँग्रेस (जेकब)ने १, कम्युनिस्ट मार्क्सवादी पक्ष केरळ राज्य समितीने १ जागा जिंकली. याव्यतिरिक्त चार अपक्ष उमेदवार विजयी झाले आहेत. या निकालामुळे केरळमध्ये काँग्रेसच्या नेतृत्वात सत्ता स्थापन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.


तामिळनाडूत सर्व २३४ जागांचे कल आणि निकाल जाहीर झाले आहेत. तमिलगा वेत्री कळघमने ९६ जागा जिंकल्या आणि ११ जागांवर आघाडी घेतली आहे. यामुळे तमिलगा वेत्री कळघमच्या नेतृत्वात तामिळनाडूत सत्ता स्थापन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तामिळनाडूमध्ये द्रमुकने ५४ जागा जिंकल्या असून ६ जागांवर आघाडी घेतली आहे. अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळघमने ४४ जागा जिंकल्या आणि ३ जागांव आघाडी घेतली आहे. काँग्रेसने ५ जागा जिंकल्या आहेत. पीएमकेने २ जागा जिंकल्या आणि २ जागांवर आघाडी घेतली आहे. आययूएमएलने २ जागा जिंकल्या आहेत. सीपीआय, विदुथलाई चिरुथाईगल कच्ची, सीपीआयएम यांनी प्रत्येकी दोन जागा जिंकल्या आहेत. भाजप, देसिया मुरपोक्कू द्रविड कळघम आणि अम्मा मक्कल मुनेत्र कझागम यांनी प्रत्येकी एक जागा जिंकली आहे.

# दुचाकीसाठी पेट्रोलचा शोध

## अपघातात तरुणाचा बळी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**




केज तालुक्यातील औरंगपुर येथील तरुण विवेक सुधीर रानमारे वय २७ वर्षे हा दुचाकीवर पेट्रोल आणण्यासाठी अंबा साखर परिसरातील पेट्रोल पंपावर गेला होता परतताना रविवार रोजी रात्री ११ च्या सुमारास वाजता टँकर दुचाकी यात जोराची धडक झाली यामध्ये तरुण गंभीर जखमी झाला स्वाराती रुग्णालयात उपचारा दरम्यान सोमवारी सकाळी त्याचे निधन झाले.मागील चार दिवसांपासून पेट्रोल, डिझेल,सीएनजी चा सर्वत्र तुटवडा आहे. गाडीत पेट्रोल आणण्यासाठी गेलेल्या तरुणांचा अपघातात बळी गेला.घटनेनंतर पोलिसांनी पंचनामा करून टँकर ताब्यात घेतले.तरुणावर औरंगपूर येथील शेतात मंगळवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

अत्यंत शांत स्वभाव व हुशार व्यक्तीमत्व,लातुर येथे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून नाशिक येथे मेडीसीन कंपनीत कार्यरत होते. तसेच हाडाचे चाळे बसवणे खांदे,गुडघा, मनका दुखणे यावर उपचार करण्यात ते तरबेज होते.आजोबांचा वारसा जोपासत हजारो रुग्ण दुरुस्त केले होते. माजी सरपंच सामाजिक कार्यकर्ते सुधीर रानमारे यांचा तो मुलगा होता.

# गेवराईत भाजप जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ उत्साहात

दैनिक वादळ वार्ता

**गेवराई । प्रतिनिधी**




भाजप युवा नेते रोहित राजाभाऊ पंडित यांच्या भारतीय जनता पार्टी जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या हस्ते ३ मे २०२६ रोजी उत्साहात पार पडला. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राजवर्धन कॉम्प्लेक्समध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी बोलताना बदामराव पंडित यांनी कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. शासकीय कामांबाबत अपुरी माहिती व सहकार्याअभावी अनेकांची कामे प्रलंबित राहतात, अशा वेळी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी लोकांना मार्गदर्शन करून त्यांची कामे पूर्ण करून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

युवा नेते रोहित पंडित यांनीही या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून शहर व ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच पक्षाचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून संघटन मजबूत करण्यासाठी हे कार्यालय उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास माजी जि.प. सदस्य बप्पासाहेब तळेकर, युवानेते यशराज पंडित, शिवराज पवार, तालुकाध्यक्ष उद्धव रासकर, सचिन दाभाडे, राजेंद्र पवार, नगरसेवक गटनेते ॲड. राजेंद्र राक्षसभूवनकर, माजी नगरसेवक राजेंद्र आर्दड यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच विविध मान्यवरांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

## जनगणना मध्ये जमातीच्या अनुक्रमांक दुरुस्तीची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**नायगाव । प्रतिनिधी**

जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर अनुसूचित जमातींच्या यादीतील अनुक्रमांक दुरुस्त करण्याची मागणी पुढे आली आहे. याबाबत नायगाव तालुक्यातील शिवसेना उपतालुकाप्रमुख शंकर पांडुरंग तंमवाड यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांना निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यात २०२६ मध्ये घरगणना प्रक्रिया सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर अनुसूचित जमातींच्या यादीचे परीक्षण करताना ‘कोळी महादेव’ व ‘डोंगर कोळी’ या जमातींचा अनुक्रमांक चुकीचा दाखविण्यात आल्याचा मुद्दा समोर आला आहे. सदर जमातींचा योग्य अनुक्रमांक २९ असताना, तो २८ वर दाखविण्यात आल्याची बाब निदर्शनास आणून देण्यात आली आहे.भारत सरकार तसेच राज्य सरकारच्या अधिकृत यादीनुसार ‘कोळी महादेव’ व ‘डोंगर कोळी’ या जमातींची नोंद अनुक्रमांक २९ वर आहे. त्यामुळे ही चूक तात्काळ दुरुस्त करून संबंधित नोंद २९ क्रमांकावर करण्यात यावी, तसेच ऑनलाइन पोर्टलवरही योग्य ती सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.ही दुरुस्ती वेळेत न झाल्यास संबंधित जमातींना शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सुनेत्रा पवार आणि अक्षय कर्डिले लाखोंच्या मताधिक्याने विजयी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**




राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निकालानुसार राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत तर अक्षय कर्डिले राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत लाखोंच्या मताधिक्याने विजयी झाले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार असलेल्या सुनेत्रा पवार आणि भाजपचे उमेदवार असलेले अक्षय कर्डिले या दोघांच्या दणदणीत विजयामुळे महायुतीने आपल्या दोन्ही जागा राखल्या आहेत. याआधी अजित पवार बारामतीचे तर शिवाजीराव कर्डिले राहुरीचे आमदार होते. पण त्यांच्या निधनामुळे बारामती आणि राहुरी मतदारसंघ रिक्त झाले होते. यामुळेच दोन्ही विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेण्यात आली.

बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटननिवडणुकीत राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्वोच्च नेत्या सुनेत्रा अजित पवार यांना दोन लाख अठरा हजार ९६९ मते मिळाली. सुनेत्रा पवारांचा २४ फेऱ्यांअखेर दोन लाख अठरा हजार ०३४ मतांनी विजय झाला. त्यांनी नवीन राष्ट्रीय समाज पक्षाच्या प्रो. आर. वाय. घुटुकडे सर यांचा पराभव केला. प्रो. आर. वाय. घुटुकडे सर यांना फक्त ९३५ मते मिळाली. तेच या निवडणुकीतले दुसऱ्या क्रमांकाचे उमेदवार ठरले. बारामतीच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून बिग बॉस फेम अभिजीत बिचुकले आणि करुणा धनंजय मुंडे हे पण रिंगणात होते. बिचुकले यांना ३३३ तर करुणा धनंजय मुंडे यांना ३०१ मते मिळाली.

राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटननिवडणुकीत भाजप उमेदवार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांना एक लाख चाळीस हजार ०९३ मते मिळाली. त्यांचा २७ फेऱ्यांअखेर एक लाख बारा हजार ५८७ मतांनी विजय झाला. त्यांनी गोविंद खंडू मोकाटे या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार अर्थात राशपच्या उमेदवाराचा पराभव केला. गोविंद मोकाटे यांना २७ हजार ५०६ मते मिळाली. तेच या निवडणुकीतले दुसऱ्या क्रमांकाचे उमेदवार ठरले.

## जिद्दीच्या जोरावर प्रविणने मिळवले यश

### एमपीएससीत उत्तीर्ण होऊन सचिवालयात क्लार्क/सहायक पदावर नियुक्ती;तरुणांसाठी प्रेरणादायी प्रवास



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

जिद्द, चिकाटी आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करत केज येथील उमरी रोड परिसरात राहणाऱ्या प्रविण भारत शिंपले या युवकाने एमपीएससी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. एमपीएससी ग्रुप क्र. २०२४ अंतर्गत सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेत उत्तीर्ण होत त्याची नवी मुंबई येथील सचिवालयात क्लार्क/सहायक पदावर नियुक्ती झाली आहे. प्रविणचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत होते. आई-वडील शेतमजुरी करून त्याच्या शिक्षणासाठी अहोरात्र परिश्रम घेत होते. वेळोवेळी प्रविण ला जवळच्या मित्रांनाही शिक्षणासाठी लागेल ती मदत केली आहे. या कष्टाचे चीज करत प्रविणने आपल्या मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. त्याच्या या यशामुळे केवळ शिंपले कुटुंबातच नव्हे, तर मित्रपरिवार आणि परिसरातही आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रविणची ही यशोगाथा अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# संपादकीय

## विशेष शाळांची अनिवार्यता

विशेष मुलांनाही सर्वसामान्यांप्रमाणे शिक्षण घेता यावे, यासाठी सर्वसमावेशक शिक्षणाची संकल्पना पुढे आली आणि त्यानुसार, ज्यांना अन्य विशेष मुलांच्या तुलनेत सर्वसामान्य शाळेमध्ये सहभागी करून घेता येईल, अशा अस्थिव्यंग विद्यार्थ्यांचा विचार सरकारने नुकत्याच एका आदेशान्वये जाहीर केला. मात्र हे करताना अशा अस्थिव्यंग किंवा अन्य विशेष शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या सुविधा, तिथल्या शिक्षकांकडून दिले जाणारे विशेष लक्ष आदी बाबींची तपासणी न करताच प्रशासनाने हा निर्णय घेतल्याचे दिसून येत आहे.विशेष मुलांमध्ये जवळपास २२ श्रेणी आहेत. या मुलांच्या शिक्षणासाठी चार प्रवर्गांना मान्यता दिली आहे. मतिमंद, गतिमंद किंवा ऑटिझम, त्यानंतर अंध, कर्णबधिर आणि अस्थिव्यंग. विशेष मुलांच्या गरजा या सर्वसामान्य मुलांपेक्षा वेगळ्या आणि अधिक संवेदनशील असतात. त्यामुळे त्यांच्यासाठी शिक्षणाची पद्धत, साधने, शिक्षकांची तयारी आणि शाळेचे वातावरण हे सर्व काही वेगळ्या प्रकारे आखावे लागते. अस्थिव्यंग, मतिमंद, कर्णबधिर, अंध, ऑटिझम अशा विविध प्रवर्गातील मुलांना एकाच चौकटीत बसवून शिक्षण देणे व्यवहार्य नाही. प्रत्येक मुलाची क्षमता, मर्यादा आणि शिकण्याची पद्धत वेगळी असते. यासाठीच विशेष शाळांची निर्मिती झाली आणि आजही त्यांचे महत्त्व कमी झालेले नाही.ज्या मुलांबाबत हा निर्णय घेण्यात आला आहे, त्या अस्थिव्यंग मुलांबाबत बोलायचे तर, त्यांचे स्वतःच्या शरीरावर नियंत्रण नसते. सेरेब्रल पाल्सी विकारात कोणाचे हात लुळे असतात किंवा पाय अधू होतात, डोळ्यांत तिरळेपणा येतो, कधी कधी बोलण्यातही अडथळे येतात, मेंदूवर नियंत्रण नसल्यामुळे सतत लाळ येत असते. मेलिंगो मायलेसिसमध्ये मुलांना लघुशंकेवर नियंत्रण नसते. अशा मुलांना स्वच्छतागृहात नेण्यासाठी विशेष काळजीवाहकांची आवश्यकता असते. अस्थिव्यंग मुलांमध्येच बहुविकलांगांचाही समावेश होतो. मानसिक विकलांग शाळांमध्येही शारीरिक अपंग मुले असतात आणि अस्थिव्यंग मुलांमध्येही मानसिक विकलांग मुले असतात.अनेक शाळांमध्ये अजूनही पाश्चिमात्य शौचालय, रॅम्प किंवा लिफ्टसारख्या मूलभूत सुविधा नाहीत. या मुलांना केवळ वर्गात बसवून शिकवणे पुरेसे नसते; त्यांना फिजिओथेरपी, समुपदेशन, भाषिक आणि वर्तणूक विकास अशा अनेक पूरक सेवांची गरज असते. त्यात शाळेतील मुले त्यांना चिडवायला लागली (आणि असे प्रकार घडलेही आहेत) तर त्यांच्या मनावर विपरीत परिणाम होईल, अशी भीती एका पालकाने व्यक्त केली. तर, जिथे सर्वसामान्य शाळांमध्ये एका वर्गात ३० ते ६० मुले असतात, अशा शाळेत अभ्यासात 'नॉर्मल' असणाऱ्या मुलांकडेही किती वैयक्तिक लक्ष दिले जाते?, असा सवाल एका शिक्षकाने उपस्थित केला.

मुलांचा 'आयक्यू' ५०च्या खाली असेल तर ते मूल 'विशेष' म्हणजे मानसिक विकलांग गटात मोडले जाते. त्यातही 'स्लो लर्नर' हाही प्रकार असतो.या मुलांचा आयक्यू ७० पेक्षा कमी परंतु ५०पेक्षा जास्त असतो. परंतु ते मानसिकदृष्ट्या शिक्षण घेण्यासाठी पूर्णपणे सक्षम नसतात. थोडे फार शिकू शकतात, परंतु त्यांच्यावर विशेष लक्ष देण्याची गरज असतेच. 'काही मुलांना सर्वसामान्य शाळेत घातले तरी, अशा शाळेचे धोरण असते की, कोणाला नापास करायचे नाही. यात शाळेच्या प्रतिष्ठेचा प्रश्न असतो. त्यामुळे या मुलांना कसेबसे दहावीपर्यंत ढकलले जाते. परंतु तोपर्यंत या मुलांना ज्या विशेष शिक्षणाची गरज असते, ते त्यांना मिळालेलेच नसते. त्यानंतर त्यांचेही वय वाढते आणि वैयक्तिक विकासाच्या ज्या बाबी त्यांना सुरुवातीला शिकणे गरजेचे असते, ते या वयात आत्मसात करणे कठीण जाते,' याकडे विशेष मुलीचे पालक असणारे सुनील करकरे यांनी लक्ष वेधले.ज्या मुलांमध्ये ४५ टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व आहे, शरीररचनेचा मुद्दा सोडला तर, आकलनक्षमता सारखी होती, त्यांना एकात्मिक शिक्षणाचा फायदा झाला. परंतु ४५ टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या मुलांची शाळेमध्ये चेष्टा होऊ लागली. त्यामुळे या मुलांमध्येही न्यूनगंड निर्माण होऊ लागला. कोणत्या मुलांना साध्या शाळा, कोणत्या मुलांना विशेष शाळा हा सारासार विवेक बाळगून निर्णय घेणे गरजेचे आहे. या मुलांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, मात्र ते शिक्षकांकडूनही झाले नाही. काही शाळांमध्ये या मुलांसाठी स्वतंत्र शौचालय, रॅम्प तयार केले गेले, मात्र शाळांमध्ये, शिक्षकांमध्ये जी संवेदनशीलता निर्माण होणे गरजेचे आहे, त्याचा अभावच दिसून आल्याचे निरीक्षण शिक्षण क्षेत्रात काम करणारे हेरंब कुलकर्णी मांडले.मुंबईतच राहणाऱ्या एका मुलाला चौथीपर्यंत सर्वसाधारण शाळेमध्ये घातले होते, परंतु त्या मुलाला अखेर विशेष शाळेमध्ये प्रवेश घ्यावा लागला. त्याच्याकडे वैयक्तिक लक्ष दिले न गेल्याने त्याला संकल्पनाच सुस्पष्ट नव्हत्या. या संकल्पना विशेष शाळांमध्ये व्यवस्थित शिकवण्यात येत आहेत. मात्र या विशेष शिक्षणाची सुरुवात उशिरा झाल्यामुळे आता या शाळेत त्याला पहिलीला बसवण्याची वेळ आली आहे.प्रत्येक विशेष मुलाचा अभ्यासक्रम हा वेगळाच आखावा लागतो. ही विशेष मुले १८ वर्षांपर्यंतच शाळेत जाऊ शकतात, त्यानंतर या मुलांसाठी अनेक शाळांमध्येच कार्यशाळा चालवल्या जातात. कार्यशाळा नसणाऱ्या शाळांमध्ये या मुलांना ठेवता येत नाही. अशा शाळांमध्ये सरकारच्या मान्यतेपेक्षा अधिक मुले शिकतात. त्यामुळे एखाद्या शाळेत ५० मुलांचा खर्च सरकार देत असले तरी बाकीच्या मुलांच्या शैक्षणिक खर्चासाठी संस्थेला दानशूरांच्या देणग्यांवरच अवलंबून राहावे लागते.अनेक गावांमध्ये अशा शाळा नसल्याने विशेष मुलांचे पालक मुंबई–पुण्यासारख्या शहरांत राहून येथील विशेष शाळांमध्ये मुलांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करत आहेत. 'अशा शाळेमधील शिक्षकांना□तीन–तीन इयत्तांची मुले एकावेळी घेऊन बसावे लागते. डावा मेंदू–उजवा मेंदू अशा संकल्पना समजून घेऊन मुलांसाठी क्टिव्हिटी घेतल्या जातात. त्यांच्या नेमक्या गरजा काय, हे थेरपिस्टच्या मदतीने इथल्या शिक्षकवर्गाने जाणून घेतले आहे. त्यामुळे सेरेब्रल पाल्सीचा मुलगा आला, तर त्याला विस्मरण नसले तरी त्याच्या विकलांगानुसार नेमके काय काम करायचे आहे, गणित वारंवार शिकवायचे आहे की त्याच्याकडून भाषा पक्की करवून घ्यायची आहे, हे समजून त्यानुसार शिक्षक प्रत्येक मुलाचा अभ्यासक्रम आखतात. या शाळांसारखे विषयांनुसार वेगवेगळे शिक्षक नसतात. त्यामुळे या मुलाला कोणते विषय किती येतात, हे शिक्षकांना माहीत असते.या सगळ्याची नोंद आमचे शिक्षक करतात,'अशी माहिती आग्रीपाड्याच्या 'सोसायटी फॉर एज्युकेशन ऑफ द चॅलेंज्ड' शाळेच्या प्राचार्य सोनाली बने यांनी दिली.मुळात सर्वसाधारण शाळेत अशा मुलांना प्रवेश नाकारला जात असल्यानेच विशेष शाळांची निर्मिती झाली आहे, याकडेही शाळांचे संचालक आणि पालकवर्ग लक्ष वेधतात. मुंबईतही दिव्यांग मुलांसाठी इंग्रजी डॉप्ट शाळा होती. परंतु ती उच्चभ्रू होती. त्यानंतर आग्रीपाड्यामध्ये मराठी, हिंदी आणि गुजराती अशा तीन भाषांमध्ये एसईसी शाळा सुरू झाली. त्यानंतर जिल्हास्तरावर निमशहरी भागांत अशा शाळा उभारण्यात आल्या आहेत.

# शासकीय आश्रमशाळा चिंबीपाडाचा बारावी (एच एस सी) निकाल शंभर टक्के

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा चिंबीपाडा, ता. भिवंडी, जि. ठाणे या विद्यालयाने यावर्षी बारावी (उच्च माध्यमिक) परीक्षेत १०० टक्के निकालाची अभिमानास्पद नोंद करत उल्लेखनीय शैक्षणिक यश संपादन केले आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देत ही शाळा सातत्याने प्रगतीचा आलेख उंचावत मागील वर्षी प्रमाणेच यावर्षीचा निकाल देखील १०० टक्के लागला असून परिश्रमांचा अध्याय ठरला आहे.




महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने आज बारावीचा निकाल जाहीर केला. राज्याचा सरासरी निकाल ८९.७९ टक्के लागला असताना चिंबीपाडा येथील या शासकीय आश्रमशाळेने १०० टक्के निकाल लावून आदिवासी शिक्षण क्षेत्रात ओळख निर्माण केली आहे.

यावर्षी विद्यालयातून एकूण ४८ विद्यार्थी बारावी परीक्षेला होते. या सर्व ४८ विद्यार्थ्यांनी यश संपादन करून शाळेचा शंभर टक्के निकाल लागला. त्यापैकी ९ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला, कौतुकास्पद आहे.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. करिष्मा जाधव हिने ८२.५० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक, कु. प्राजक्ता गवारी हिने ८१.८३ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक,आणि कु. जुईली कोंगील हिने ७९ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांकावर झेप घेतली.

या तिन्ही विद्यार्थिनींनी परिस्थितीवर मात करत जिद्द, चिकाटी आणि शसातत्यपूर्ण अभ्यासाच्या घवघवीत यश संपादन केले असून त्यांनी शाळेसह संपूर्ण चिंबीपाडा परिसराचा मान उंचावला आहे. आदिवासी व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.या यशामागे विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप कदम यांचे सक्षम शैक्षणिक नेतृत्व, शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, तसेच अधीक्षक, अधीक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची समन्वयपूर्ण मेहनत कारणीभूत ठरली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन उत्कृष्ट निकाल शक्य झाला. विद्यालयातील शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांना शिस्त, वेळेचे नियोजन आणि गुणवत्तापूर्ण लेखन कौशल्य विकसित करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्याचा थेट परिणाम यंदाच्या उज्ज्वल निकालातून दिसून आला.

गुणवंत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. शिक्षक, कर्मचारी, पालक आणि ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला. अनेक पालकांनी आदिवासी भागातील आमच्या मुलांनीही मोठे यश मिळवू शकते हे शाळेने सिद्ध करून दाखवले, अशा भावना व्यक्त केल्या.

विद्यालयाच्या या दैदिप्यमान यशाबद्दल मुख्याध्यापक संदीप कदम, शिक्षक आर. एन. ठाकरे, आदिनाथ अवघडे, राजेश वळींकर, सविता जाधव अधीक्षक महादेव भंडारी, अधीक्षिका माधुरी लोखंडे, सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

शासकीय आश्रमशाळा चिंबीपाडाने मिळवलेले हे यश आदिवासी शिक्षणाच्या गुणवत्तेचे प्रेरणादायी उदाहरण ठरत असून आगामी काळातही अशीच यशाची परंपरा कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक मुंबई येथे संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**



महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक मुंबई येथे कार्यालयात पार पडली या बैठकीला कर्जत शहरातर्फे शहराध्यक्ष व शहर कमिटी उपस्थित होती यामध्ये प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे व खासदार सुरेश म्हात्रे यांच्याबरोबर कोरोना काळात बंद झालेल्या रेल्वे गाड्या पुन्हा सुरळीत चालू व्हावेत व लांब पल्ल्याच्या गाड्यांना कर्जत रेल्वे स्थानकावर थांबा मिळावा कारण कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनच्या कार्यक्रमाला जी सह्यांची मोहीम शहरांमध्ये घेतली गेली होती त्यामध्ये पक्षाने सहभाग घेतला होता तरी ह्या मीटिंगमध्ये कर्जत शहराला रेल्वेचा थांबा मिळावा अशी प्रमुख मागणी शहराध्यक्ष एडवोकेट भाऊसाहेब मोरे यांनी महाराष्ट्र रेल्वे बोर्डावर असणारे खासदार सुरेश म्हात्रे यांच्या जवळ केली होती व त्यांनी कर्जत शहरातील शिष्टमंडळ माझ्याकडे घेऊन या आपण डीआरएम ऑफिसला बरोबर जाऊन त्यांच्याकडून आपल्या मागण्या मान्य करून घेऊ व त्यांच्याकडे जाऊन निवेदन देऊ असे आश्वासन दिले तसेच मी पुढच्या आठवड्यामध्ये आपण निवेदकांना बरोबर घेऊन या मी त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करीन असे सुतोवाच केले तर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेसचा पक्षाचा पूर्ण पाठिंबा असल्याचे जाहीर केले

कर्जत तालुक्यात टोरंट प्रकल्प पोशीर धरण व शिलार धरण या दोन्ही धरणांना कर्जत शहराध्यक्ष एडवोकेट भाऊसाहेब मोरे यांनी विरोध केला होता प्रत्यक्ष धरण बाधित लोकांना भेटून त्यांच्या मागण्या हे धरण होऊ नये म्हणून आहेत असे पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष व खासदारांना सांगितले व त्यांनी दोघांनी स्वतः या गोष्टीकडे लक्ष देणार आहोत वेळ पडल्यास उपोषण स्थळी त्या दोन्ही धरणात धरण बाधित गावांना भेट देण्याचा आश्वासन दिले त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा आंदोलनाला पूर्ण पाठिंबा असण्याचे जाहीर केले.

# सुरक्षा रक्षक समीर भागोजी कोळवणकर यांना सन्मानित



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई,शहर जुने कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई नं.४००००१ येथे १में रोजी सकाळी ०७:१५ वाजता महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनानिमित्ताचे औचित्य साधून सुरक्षा रक्षक मंडळाचे सुरक्षा रक्षक समीर भागोजी कोळवणकर यांना त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल कौशल्य व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या शुभहस्ते सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.ते सध्या तामिळनाडू मेरकन्टैल बँकेमध्ये कार्यरत आहेत.या प्रसंगी मुंबई शहराचे जिल्हाधिकारी आंचल गोयल (IAS) उपस्थित होते.त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.विक्रोळी कन्नमवार नगर, शिंदे शिवसेनेचे माजी नगरसेवक व विद्यमान बेस्ट समिती सदस्य उपेंद्र सावंत यांनी समीर कोळवणकर यांचे अभिनंदन केले असून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# प्रियांशी आशाराम जामनेरकर उरण तालुक्यातून प्रथम

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निकालाचा दिवस तसा कौतुकाचा आणि आनंदाचा होता सर्वत्र गुणवंत विद्यार्थ्यांवर अभिनंदनचा वर्षाव होत असताना अकोला जिल्ह्यातील अनकवाडी या छोट्याशा गावातील कुमारी प्रियांशी आशाराम जामनेरकर या विद्यार्थिनीने मुंबईत विभागातील उरण या तालुक्यात आपली बाजी मारली आहे. उरण येथील सिटीजन हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये ८७.५०% गुण घेत घवघवीत यश प्राप्त करून सायन्स शाखेतून उरण तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उपेक्षित गुणवंत विद्यार्थिनीचे नाव कुमारी प्रियांशी आसाराम जामनेरकर असून सिटीजन हायस्कूल ज्युनिअर कॉलेज उरण येथे शिक्षण घेऊन शिक्षक सादिक सर, शैलेंद्र प्रजापती, नरेंद्र पाटील ,प्रमोद पाटील , व साजिया मामी यांच्या मार्गदर्शनाखाली व विवेकानंद येथील कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षक दत्तात्रय शेळके , मयूर पाटील,आदित्य सर यांचे मार्गदर्शन घेऊन उत्तम अभ्यास करून तालुक्यातील पहिला क्रमांक पटकावला आहे. प्रियांशी चे वडील शेतकरी असून उरण येथे एसटी बस चालक आहेत व आईचे वडापावचे दुकान आहे.तिने दहावीपर्यंत जनरल एज्युकेशन इन्स्टिटच्यूट मध्ये शिक्षण घेतले. स्नितिल पडते यांच्या मार्गदर्शनाखाली तिसरा क्रमांक दहावीत पटकावला होता. पुढे प्रियांशीला इंजीनियरिंग करायची आहे असे तिथे ठरविले आहे. कम्प्युटर सायन्स किंवा आर्टिफिशल इंटेलिजन्स या ब्रांच मध्ये पुढचे करिअर तिला करायचे आहे. सायन्स शाखेतून प्रियांशी आशाराम जामनेरकर ही उरण तालुक्यातून प्रथम आल्याने तिच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# अजनसोंडा (बु:) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

## डॉ बाबासाहेब आंबेडकर विविधतेतून एकता घडविणारे संविधानकार–हणमंतराव पाटील

दैनिक वादळ वार्ता

**लातूर । प्रतिनिधी**

अजनसोंडा बुद्रुक ता .चाकूर जिल्हा लातूर येथील भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विविधतेतून एकता घडविणारे थोर संविधानकार होते असे प्रतिपादन गावचे माजी सरपंच तथा लातूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य हनुमंतराव पाटील यांनी केले ते गावातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अजनसोंडा( बु:) येथील कार्यक्रमात बोलत होते जयंती अत्यंत उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी साडेनऊ वाजता गावातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात गावचे माजी सरपंच व लातूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य हनुमंतराव पाटील यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक किसन बापू माने. उपसरपंच आबासाहेब माने .शिवाजीराव माने . वारकरी संप्रदायाचे सिद्धू माने महाराज . आदर्श शिक्षक तातेराव भालेराव . दिनकर काकनाटे . संपतराव गायकवाड .यांच्यासह जयंती महोत्सवाचे अध्यक्ष अनिल भालेराव . सुशील काकनाटे . सुधाकर गायकवाड .गंगाधर भालेराव. हरिश्चंद्र काकनाटे. बाळू भालेराव .बौद्ध समाजातील सर्व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून ध्वजारोहण करण्यात आले . यावेळी



जयंतीची तारीख २९ एप्रिल हि निश्चित करण्यात आली होती सकाळीच अन्नदाते किसन बापू माने यांच्यावतीने अन्नदान करण्यात आले अनेकांनी या भोजनाचा आस्वाद घेतला दुपारी चार वाजेपासून डॉ .बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूकीला सुरूवात करण्यात आली परिसरातील जनसमुदाय मोठ्या संख्येने सहभागी झाला होता ज्यामध्ये महिलांचा सहभाग लक्षणीय होता भिमरायाच्या विचारांचा जागर करत ही मिरवणूक गावातील मुख्य रस्त्याने वाजत गाजत रात्री ९ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात विसर्जन करण्यात आले या जयंती महोत्सवाचे नेतृत्व आंबेडकरी चळवळीतील सर्व युवा तरुणांनी सर्वांनी मिळून कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक दिनकर काकनाटे यांनी केले तर उपस्थितांचे आभार अध्यक्ष अनिल भालेराव आणि सुशील काकनाटे यांनी माणले

या सोहळ्यामुळे संपूर्ण अजनसोंडा बुद्रुक परिसरातील उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## वानवडा येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न


# ह.भ.प देविदास महाराज निवळीकर यांच्या काला किर्तनाने व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता



दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील वानवडा गाव धार्मिक व सांप्रदायाचा वारसा लाभलेले गाव वानवडा गावला संताची पावन भुमी मनुन नावलौकीक असुन वानवडा येथे गेल्या ७३ वर्षापासुन पारंपारीक अखंड हरिनाम सप्ताह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा साजरा केला जातो ,वानवडा येथील सप्ताहात गावामध्ये प्रति पंढरपुर प्रमाने भाविकांची गर्दी पहायला मीळते ,वानवडा गावचे ग्रामदैवत नृसिंह व विठ्ठल रुक्मिनी मंदीरात पारंपारीक पद्धतीने चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताहात काकडा ,ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण ,गाथा भजन ,हरिपाठ ,सह नामांकीत किर्तनकारांच्या माद्यमातुन किर्तनाचे आयोजन करण्यात येते,आज गावात ग्रंथदिंडी काडण्यात आली या ग्रंथदिंडी मध्ये गावातील महिलांनी डोक्यावर कलश घेउन फुगडी खेळत हरिनामाचा जयघोष करत मोठ्या भक्तीभावाने ग्रंथदिंडी संपन्न झाली ,त्यानंतर काला किर्तन व रुचकर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता करण्यात आली ,यावेळी
शरद माने ,भास्कर व्हंताळे ,महादेव मिरकले ,दयानंद तळेकर ,बालाजी मिरकले ,सरपंच फुलचंद अंधारे ,चेअरमन आशोक विर ,शामराव सुर्यवंशी ,भरत कदम ,रुपशेन सोमवंशी,
शंकर पाटील, अजय मिरकले
खंडू सुर्यवंशी ,संदिप सोमवंशी
पवन सुर्यवंशी ,कृष्णकांत सांगावे,रवि सुर्यवंशी शत्रुघ्न माने,अजय विर
राहुल काळे ,ओमकार अंधारे
प्रदीप सोमवंशी,लिंबराज सोमवंशी ,लहु विर ,वग्रसेन कदम ,अंगद मिरकले ,पंढरीनाथ काळे ,सुर्यकांत सोमवंसी ,हरिबा कोळी ,सुकलाल सोमवंशी ,उपसरपंच दिपक काळे ,शहाजीराव पाटील ,हंसराज काळे ,ज्ञानेश्वर मिरकले .आकाश रंदवे ,लक्ष्मन सोमवंशी ,मंथन सोमवंशी ,गनेश मिरकले ,संतोष काळे ,पदमाकर मिरकले ,महेश काळे .नारायण सोमवंशी ,नागनाथ काळे ,शिवशंकर काळे धनराज निकम ,राजेंद्र घोडके,शिवाजी मिरकले ,सह वानवडा गावातील भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

## जागतिक कामगार दिना निमित्त राष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी केले नेपाळ मधील कामगारांना मार्गदर्शन



दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**

१ मे जागतिक कामगार दिना निमित्ताने नेपाळ ट्रेड युनियन काँग्रेस कडून राष्ट्रीय परीषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला आय टी एफ चे एक्झिक्युटिव्ह बोर्ड मेंबर तथा इंटकचे राष्ट्रीय सविक राष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.
आपल्या मार्गदर्शन पर भाषणात महेंद्र घरत यांनी केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणांचा कडाडून विरोध केला व आम्ही सर्व नेते कामगारांच्या न्याय हक्कासाठी सदैव लढत राहू असे कामगारांना आश्वाशित केले.
या परिषदेसाठी आय टी एफ लंडनचे जनरल सेक्रेटरी स्टीफन कॉटन, एसीया पॅसिफिक रिजनल सेक्रेटरी अब्दुल गनी सारंग, नेपाल काँग्रेस अध्यक्ष गगन थापा, काँग्रेस जेष्ठ नेते शेखरजी कोईराला, नेपाळ ट्रेड युनियनचे अध्यक्ष योगेंद्र कुमार, नेपाळ ट्रेड युनियन तथा आय टी एफ चे एक्झिक्युटिव्ह बोर्ड मेंबर अजयकुमार राय आदी उपस्थित होते, या परीषदेनंतर महेंद्रशेठ घरत यांनी नेपाळचे अध्यक्ष रामचंद्र पौडेलजी यांची भेट घेतली. नेपाळ ट्रेड युनियन काँग्रेस तर्फे परीषदेचे अतिशय चांगले नियोजन करण्यात आले होते.

## य.मा.व ज्यु.कॉलेज नायगाव या कॉलेजची बारावी निकाल यशाची परंपरा या ही वर्षी कायम विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**

यमुनाबाई माध्यमिक व ज्युनियर कॉलेज नायगाव ता.नायगाव जिल्हा नांदेड या कॉलेज मधील बारावी विज्ञान शाखेला एकूण-६८ विद्यार्थिनी प्रविष्ठ झाल्या होत्या त्या पैकी-६८ उत्तीर्ण झाल्या आहेत.प्रथम श्रेणीत-०८ द्वितीय श्रेणीत-५२ उत्तीर्ण-६८ बारावी विज्ञान शाखेचा निकाल-१०० % लागला आहे.बारावी कला शाखेत एकूण-३५ विद्यार्थिनी प्रविष्ट झाल्या होत्या त्या पैकी-३२ विद्यार्थ्यिनी उत्तीर्ण झाल्या आहेत.प्रथम श्रेणीत-७ द्वितीय श्रेणीत-१९ उत्तीर्ण-३२ बारावी कला शाखेचा निकाल-९१.४२ % लागला आहे.
विज्ञान शाखेत गुणानुक्रमे
१)कु.निकिता पांढरे-७०.८३%
२)कु.स्नेहल नरवाडे-६७.८३%
३)कु.महादेवी तोकलवाड-६६.१७
कला शाखेत गुणानूक्रमे-
१)कु.संजना पांढरे-७१.८३%
२)कु.वैष्णवी शिंदे-६५ %
३)कु.मयुरी गंगुलवार-६३.१७%
वरील सर्व गुणवंत विद्यार्थिनींचे, पालकांचे व सर्व विषय शिक्षकांचे संस्था अध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर उपाध्यक्ष दत्तात्रय पाटील होटाळकर,सचिव श्रीमती सिंधूताई होटाळकर संचालक भाऊराव पाटील होटाळकर, प्राचार्य फाजगे यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.सदर शाळा व कॉलेजचे नायगाव पंचक्रोशीत कौतुक होत आहे.

## दारव्हा तालुक्यातील पळशि येथील बुद्ध जयंतीदिनी कॅण्डल रॅली



दैनिक वादळ वार्ता
**दारव्हा । प्रतिनिधी**

दारव्हा तालुक्यातील पळशी गावात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बुद्ध जयंतीचे निमित्ताने कॅन्डल रॅलीचे भव्य आयोजन केले गेले. पळशी गावाच्या स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून दिनांक एक मे रोजी संपूर्ण पळशी गावाच्या मुख्य मार्गाने बौद्ध उपासिकांच्या शुभ वस्त्र परिधान करून हातात कॅण्डल घेऊन बुद्धग... शरणग... गच्छामि धम्मंम शरणग.. गच्छामि संघग शरणग गच्छामि. हा मंत्र देत संपूर्ण गावात मार्गक्रम करत रात्री नऊ वाजताच्या दरम्यान भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. शेकडो महिलांनी या भव्यदिव्य कॅण्डल रॅलीत सहभाग घेऊन तथागत भगवान गौतम बुद्धांचा शांतीचा संदेश संपूर्ण गावात पसरविला. त्यामुळे संपूर्ण पळशी गाव शांतमय वातावरणात दिसून येत होते. सदर संपूर्ण कॅण्डल रॅली गावातच्या मुख्य मार्गाने फिरून स्थानिक माता रमाई बुद्ध विहारात बुद्ध वंदना व पंचशील त्रिशरण आचरण करून रॅलीचे समारोप करण्यात आले त्यावेळेस. सौ अश्विनीताई किशोर कांबळे. सौ यमुनाताई अजबराव जाधव. सौ वैशालीताई अमोल खंडारे. सौ प्रेमिलाताई गजेंद्र कांबळे. शुभम खंडारे. ग्रामपंचायत सदस्य संतोष खंडारे. चंद्रमणी खंडारे. दुर्योधन बरडे. शिवदास बर्डे. दिनेश जाधव. ताराचंद खंडारे. आकाश कांबळे. प्रवीण बर्डे
भीमराव कोल्हे. बाळाभाऊ खंडारे. सतीश सावळे. युवराज कांबळे. तथा बुद्ध उपासक बुद्धउपासिका यांनी अथक परिसरात घेतले

## आई म्हणजे फक्त एक नातं नसतं ती स्वतःचं आयुष्य पणाला लावणाषरी शक्ती असते!

दैनिक वादळ वार्ता
**पाचोड । प्रतिनिधी**



नर्मदा नदीत घडलेली ही दुर्घटना मन हेलावून टाकणारी आहे
एका आईने स्वतःचा जीव धोक्यात घालून आपल्या बाळाला वाचवण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न केला
पण नियतीने दोघांनाही आपल्यात सामावून घेतलं
बचाव पथकाला जेव्हा त्यांचे मृतदेह सापडले, तेव्हा त्या आईने आपल्या बाळाला घट्ट मिठीत धरलेलं होतं
हा दृश्य पाहून प्रत्येकाचं मन सुन्न झालं डोळ्यातून अश्रू अनावर झाले
आईचं प्रेम हे शब्दात मावणारं नाही
जगातली सगळ्यात खरी, निस्वार्थ आणि शेवटपर्यंत साथ देणारी गोष्ट म्हणजे आई

## गडचांदूरचा मान उंचावला! पोलीस निरीक्षक शिवाजी कदम यांना ‘DGP सन्मान चिन्ह’ बहाल

दैनिक वादळ वार्ता
**कोरपना । प्रतिनिधी**

गडचांदूर शहरासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. कर्तव्यनिष्ठ, शिस्तप्रिय आणि जनतेच्या विश्वासाला पात्र ठरलेले पोलीस निरीक्षक शिवाजी कदम यांना महाराष्ट्र पोलिस दलातील अत्यंत प्रतिष्ठेचे ‘पोलीस महासंचालक (DGP) सन्मान चिन्ह’ बहाल करण्यात आले आहे.
१ मे महाराष्ट्र दिनाच्या औचित्याने जिल्हा पोलीस मुख्यालयात आयोजित भव्य समारंभात पालकमंत्र्यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.
त्यांच्या उल्लेखनीय आणि धडाकेबाज कामगिरीमुळे केवळ गडचांदूरच नव्हे, तर संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्याचा मान उंचावला आहे.
शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवताना





त्यांनी दाखवलेली तत्परता, गुन्हेगारीवर बसवलेली कडक लगाम आणि नागरिकांमध्ये निर्माण केलेला विश्वास या सर्व बाबींमुळेच त्यांना हा मानाचा सन्मान मिळाला आहे.आपल्या संपूर्ण पोलीस पथकाला सोबत घेत त्यांनी केलेली कार्यक्षमता आणि नेतृत्व आज इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.
या सन्मानामुळे गडचांदूर शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, हा सन्मान म्हणजे संपूर्ण शहराचा सन्मान अशा भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहेत.
दैनिक लोकनेता न्यूज नेटवर्क तर्फे पोलीस निरीक्षक शिवाजी कदम यांचे मनःपूर्वक अभिनंदन!
पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरडफ येथे ‘महाराष्ट्र दिन’ उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**हदगाव । प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतरचा टप्पा आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा गौरवशाली दिवस म्हणजेच *'महाराष्ट्र दिन'*. हा सुवर्ण दिन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरडफ येथे मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला.

**ध्वजारोहण आणि मानवंदना**

सकाळी ठीक ८:१० वाजता शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष *पवन पाटील मोरे* यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाला शिस्तबद्ध मानवंदना दिली. राष्ट्रगीत, वंदे मातरम आणि राज्यगीताच्या गायनानंतर उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांनी 'जय महाराष्ट्र'च्या घोषणा दिल्याने संपूर्ण शालेय




परिसर दणाणून गेला होता.

**प्रशासकीय पारदर्शकता हीच खरी सेवा – मुख्याध्यापिका**

याप्रसंगी बोलताना शाळेच्या मुख्याध्यापिकांनी उपस्थितांना संबोधित केले. त्या म्हणाल्या की, महाराष्ट्र ही संतांची आणि शूरवीरांची भूमी आहे. राज्याच्या प्रगतीत प्रत्येक नागरिकाचा वाटा महत्त्वाचा आहे. प्रशासकीय स्तरावर सर्वसामान्य जनतेची कामे वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करणे, हीच खऱ्या अर्थाने राज्याची सेवा ठरेल.

**मान्यवरांची उपस्थिती**

या कार्यक्रमाला शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष पवन पाटील मोरे, ग्रामसेवक साईनाथ जिद्दीवाड, सरपंच वंदनाताई वाठोरे, 'हिंदवी स्वराज्य'चे संस्थापक अध्यक्ष शिवाजी पाटील हरडफकर, सोसायटीचे चेअरमन नागोराव पाटील सूर्यवंशी, उपसरपंच बालाजी पाटील सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.
तसेच ग्रामपंचायत सदस्य रामराव सूर्यवंशी, आकांक्षा वायवाळ, शिवाजीराव धामणकर, गणेश सूर्यवंशी, मारुती सूर्यवंशी, सर्व शिक्षक , श्रीमती चाकोरे, श्रीमती कदम, श्रीमती माकोडे, श्री वडजे, श्री नरवाडे, श्री चुनाळे, श्री पवार, श्री गुरुमे, श्री जीवणे वृंद आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता उपस्थितांना अल्पोपहार देऊन करण्यात आली.

## पंचशील उच्च माध्यमिक विद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम

### विज्ञान शाखेचा ९१ तर कला शाखेचा ८३ टक्के निकाल

दैनिक वादळ वार्ता
**हदगाव । प्रतिनिधी**

शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता बारावीच्या ऑनलाईन निकालात विज्ञान शाखेचा निकाल ९१ टक्के तर कला शाखेचा निकाल ८३% लागला असून शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.
विज्ञान शाखेतून कुमारी आरती दत्ता शिंदे ८६.३३ तर कुमारी पूजा शिवाजी वाघमारे ७४.६७ कुमारी प्रज्ञा सत्यप्रकाश कुंभकर्ण ७२.६७,शुभम शंकर राठोड ७१.३३
गुण प्राप्त करून अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.
तर कला शाखेतून गंगाराम दिगंबर झाडे ८०.१७, कुमारी पल्लवी रावसाहेब वानखेडे ७८.३३ कुमारी प्रज्ञा प्रदीप पाईकराव ७७.८३,अभय गौतम काळबांडे ७६.१७तर कुमारी दिपाली बालाजी गायकवाड ७५.८३ टक्के गुण प्राप्त करून अनुक्रमे



प्रथम,दुतीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.
सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव सुनील हरिहरराव सोनुले सह सर्व संचालक मंडळ तसेच प्राचार्य अनिल दस्तूरकर सह उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राध्यापकांनी अभिनंदन केले आहे

# आपल्या कुटुंबाची माहिती आता स्वतःच नोंदवा; स्व-गणना २०२६ प्रक्रियेला सुरुवात

## तहसीलदार अशोक भंडारे यांचे नागरिकांना आवाहन, १५ मे पर्यंत मुदत

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

भारत सरकारच्या जनगणना प्रक्रियेअंतर्गत सन २०२६ च्या जनगणनेसाठी 'स्व-गणना' (Self Enumeration) सुविधेचा प्रारंभ झाला आहे.दि.१ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत नागरिकांना आपल्या कुटुंबाची माहिती ऑनलाईन पद्धतीने स्वतः भरता येणार आहे. या प्रक्रियेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवावा,असे आवाहन तहसीलदार श्री.अशोक भंडारे यांनी केले आहे.

**काय आहे स्व-गणना प्रक्रिया?**

जनगणनेची प्रक्रिया अधिक सुलभ आणि अचूक करण्यासाठी सरकारने डिजिटल माध्यमाचा वापर केला आहे.यात नागरिक प्रत्यक्ष प्रगणक घरी येण्यापूर्वीच आपली आणि आपल्या कुटुंबाची माहिती अधिकृत पोर्टल वर भरू शकतात.यामुळे वेळेची बचत होऊन अचूक माहिती संकलित होण्यास मदत होणार आहे.

**माहिती भरण्यासाठीच्या स्टेप्स**

१.लॉग-इन अधिकृत वेबसाईट https://se.census.gov.in वर जाऊन राज्याची निवड करावी.

२.नोंदणी- कुटुंब प्रमुखाचा मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी नोंदवून जढझ द्वारे पडताळणी




करावी.

३स्थान निश्चिती- जिल्हा, तालुका,गाव आणि नकाशावर आपल्या घराचे अचूक लोकेशन मार्क करावे.

४.प्रश्नावली- कुटुंबातील सर्व सदस्यांची वैयक्तिक व शैक्षणिक माहिती भरावी.

५अंतिम सबमिट

माहिती पुन्हा एकदा तपासून 'Final Submit' बटण दाबावे. एकदा माहिती सबमिट केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही.ही प्रक्रिया पूर्णपणे सुरक्षित असून, नागरिकांनी भरलेली माहिती गोपनीय ठेवली जाते. स्व-गणना केल्यानंतर प्रगणक (Enumerator) केवळ या माहितीच्या पडताळणी साठी आपल्या घरी भेट देतील. तरी सर्व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करून आपली नोंदणी वेळेत पूर्ण करावी.

-श्री.अशोक भंडारे तहसीलदार

**महत्त्वाची टीप**

स्व-गणना करण्याची सुविधा केवळ १५ मे २०२६ पर्यंत उपलब्ध आहे.ज्या नागरिकांना ऑनलाईन फॉर्म भरणे शक्य नाही,त्यांच्या घरी प्रगणक येऊन नेहमीच्या पद्धतीने माहिती संकलित करतीलच, मात्र सुजाण नागरिकांनी डिजिटल सुविधेचा लाभ घ्यावा,अशी विनंती प्रशासनातर्फे करण्यात आली आहे.

# लोहा-माळाकोळी सर्कलमध्ये तीव्र पाणीटंचाई

## काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन,आंदोलनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता

**लोहा | राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील माळाकोळी सर्कलमधील अनेक गावांमध्ये सध्या तीव्र पाणीटंचाई जाणवत असून नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने लोकप्रिय नेते भीमाशंकर (मामा) कापसे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले.

सदर निवेदनात संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ उपाययोजना करून गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करून द्यावी, तसेच आवश्यक त्या ठिकाणी त्वरित टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली. पाण्याच्या अभावामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचेही यावेळी



नमूद करण्यात आले.

यावेळी भीमाशंकर (मामा) कापसे यांनी प्रशासनावर टीका करत, जोपर्यंत पाण्याचा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहील. प्रशासनाने कुंभकर्णी झोप सोडून तात्काळ उपाययोजना कराव्यात आणि जनतेला न्याय द्यावा, असा इशारा दिला. तसेच, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तहसील कार्यालयासमोर काँग्रेस पक्षाच्या वतीने 'घंटानाद आंदोलन' छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

या वेळी बाबासाहेब बाबर, काशीराम जामकर, भारत मस्के, राजरत्न गायकवाड, रमेश ठाकूर (सर), राम पाटील कापसे, दीपक रायफळे, प्रसाद भैया पोले, विजय केंद्रे, प्रमोद नागरगोजे, रितेश एडके आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, प्रशासनाने तातडीने दखल घेऊन पाणीटंचाईचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी नागरिकांकडूनही जोर धरत आहे.

# शेतकरी कुटुंबातील युवकाची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड

दैनिक वादळ वार्ता

**लोहा | प्रतिनीधी**

लोहा तालुक्यातील चोंडी येथील शेतकरी कुटुंबातील कै. उत्तम पाटील जाधव यांचे जेष्ठ सुपुत्र श्री. संग्राम जाधव यांची पोलीस उपनिरीक्षक (झडख) पदावर निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल शिवा संघटनेचे उपतालुकाध्यक्ष साधु पाटील वडजे यांच्या कुटुंबीयांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी श्री. संग्राम जाधव यांच्या यशाचा गौरव करत उपस्थितांनी त्यांच्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीचे कौतुक केले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून



शिक्षण घेत त्यांनी हे यश संपादन केल्यामुळे ते इतर तरुणांसाठी प्रेरणादायी ठरले आहेत, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

सत्कार समारंभात पुष्पगुच्छ व शाल देऊन श्री. जाधव यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांना पुढील सेवेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी गावातील मान्यवर, मित्रपरिवार तसेच कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. संग्राम जाधव यांनी यावेळी बोलताना, हे यश माझ्या कुटुंबीयांच्या पाठिंब्यामुळे व गुरुजनांच्या मार्गदर्शनामुळे शक्य झाले असून, समाजसेवा करण्याची संधी मिळाल्याचा मला अभिमान आहे, असे सांगितले.

या निवडीमुळे चोंडी गावाचे नाव उज्ज्वल झाले असून, परिसरातून श्री. जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# लोह्यात महात्मा बसवेश्वर पुतळा सुशोभीकरणासाठी ७ मे रोजी भव्य धडक मोर्चा

## शिवा संघटनेच्या नेतृत्वाखाली नगरपरिषदेकडे कूच; प्रशासनाला दिले निवेदन

दैनिक वादळ वार्ता

**लोहा | प्रतिनीधी**

लोहा येथील महात्मा बसवेश्वर महाराजाच्या पुतळ्याच्या सुशोभीकरणाच्या मागणीसाठी शिवा संघटनेच्या वतीने गुरुवार, दि. ७ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता भव्य धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरू होणारा हा मोर्चा मुख्य मार्गाने नगरपरिषद कार्यालयावर धडकणार आहे.

या संदर्भात दि. १ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, तहसीलदार, नगराध्यक्ष, मुख्याधिकारी तसेच पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे. मोर्चासाठी पोलीस प्रशासनाकडे परवानगीही मागण्यात आली आहे.

शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष व सेवा जनशक्ती पार्टी चे पक्षप्रमुख प्रा. मनोहर धोंडे यांनी यापूर्वी दि. १ एप्रिल २०२६ रोजी पत्रकार परिषद घेऊन आंदोलनाचा इशारा दिला होता. तसेच ६ एप्रिल रोजी शिवा संघटना तालुका शाखेनेही नगरपालिकेकडे लेखी मागणी केली होती. नगरपरिषदेने आदेश देऊनही संबंधित कामगारांकडून पुतळ्याचे सुशोभीकरण न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, सुशोभीकरणासाठी कामाला



सुरुवात होऊनही स्थानिक आमदारांच्या दबावामुळे काम थांबवण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. यामुळे महात्मा बसवेश्वर प्रेमींच्या भावना दुखावल्याचे प्रा. धोंडे यांनी सांगितले.

मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू होऊन स्मशानभूमी, बसस्थानक, भाजी मंडई मार्गे नगरपरिषद कार्यालयात पोहोचणार असून, त्यानंतर समारोप सभा होणार आहे. लोकशाही मार्गाने भावना व्यक्त करून पुतळ्याचे सुशोभीकरण त्वरित सुरू करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

या मोर्चात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष व सेवा जनशक्ती पार्टी चे पक्षप्रमुख प्रा. मनोहर धोंडे सर यांनी केले आहे.

# तुलसी महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा



**बीड | प्रतिनिधी**

येथील तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने गुरुवार, १ मे रोजी ६७ वा महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणात हा सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सकाळी ७.४५ वाजता मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी राष्ट्रगीत व राज्यगीताचे सामूहिक गायन करत तिरंग्याला मानवंदना दिली.या सोहळ्याला तुलसी आयटी कॉलेजचे प्राचार्य डी.जी. निकाळजे, तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजच्या प्राचार्या डॉ. अश्विनी बेंद्रे, गुरुकुल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल, तुलसी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डी.डी. राऊत आणि माता रमाई नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य शुभम जोगदंड यांनी उपस्थित राहून विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# एव्हरेस्ट बेस कॅम्पवर फडकवला तिरंगा; सातपुड्याच्या लेकाचा आदिवासी विद्यार्थ्यांसाठी 'मिशन उत्कर्ष'चा ससंकल्प!

दैनिक वादळ वार्ता.

**रवींद्र वळवी | मोलगी**

जिद्द,चिकाटी आणि अथांग कष्टाच्या जोरावर शून्यातून विश्व निर्माण करण्याची ताकद सातपुड्याच्या मातीत आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. सातपुड्याच्या अतिदुर्गम भागातील नामांकित गिर्यारोहक अनिल वसावे यांनी जागतिक कीर्तीच्या माऊंट एव्हरेस्ट बेस कॅम्पवर ज्याची उंची (१८,३६४ फूट) आहे अशा ठिकाणी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून तिरंगा फडकवला. मात्र, ही मोहीम केवळ एका शिखरापुरती मर्यादित नसून, ती आदिवासी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा एक 'नवा संकल्प' ठरली आहे.अनिल वसावे यांनी आपल्या ढीळलरश्र Sports Foundation च्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि क्रीडा विकासासाठी एक महत्त्वपूर्ण मोहीम हाती घेतली आहे. अतिदुर्गम भागातील नैसर्गिक कौशल्य असलेल्या विद्यार्थ्यांना योग्य करिअर मार्गदर्शन मिळावे आणि त्यांनी केवळ शेती किंवा मजुरीपर्यंत मर्यादित न राहता जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये नैसर्गिकरीत्या शारीरिक क्षमता आणि काटकपणा असतो. याच क्षमतेला पैलू पाडून त्यांना क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकवण्यासाठी हे फाउंडेशन काम करणार आहे. दर्जेदार शिक्षण आणि करिअरमधील अडथळे दूर करण्यासाठी वसावे स्वतः विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत.दुर्गम भागातील विद्यार्थ्यांमध्ये टॅलेंटची कमतरता नाही, गरज आहे ती फक्त योग्य दिशा मिळण्याची. या फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही अशा प्रत्येक विद्यार्थ्याला साथ देऊ इच्छितो, ज्याला शिक्षणाची ओढ आहे पण संधी नाही. असे अनिल वसावे (गिर्यारोहक) यांनी सांगितले आहे.

अनिल वसावे हे केवळ एक मार्गदर्शक नसून स्वतः एक जागतिक दर्जाचे गिर्यारोहक आहेत. त्यांनी आतापर्यंत: किलीमांजारो (आफ्रिका) माऊंट एल्ब्रुस (रशिया) सतोपंथ, माऊंट कियाग्री आणि माऊंट स्पांगनागरी यांसारख्या अनेक उत्तुंग शिखरांवर यशस्वी चढाई केली आहे. आता नेपाळमध्ये राहून त्यांनी हा सामाजिक परिवर्तनाचा विडा उचलला आहे.

ज्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना किंवा क्रीडा क्षेत्रात करिअर करताना आर्थिक किंवा मार्गदर्शनाच्या अडचणी येत आहेत, त्यांनी अनिल वसावे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सातपुड्यातून सुरू झालेली ही ठिणगी येणाऱ्या काळात आदिवासी समाजात मोठी शैक्षणिक क्रांती घडवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077